IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 2, November 2023

# आरोग्य विज्ञान ग्रंथालयांची भूमिका : **सेवा व सुविधा**

**डॉ. दिनेश विक्रम पाटील**

**ग्रंथपाल, महाराज. ज. पी. वळवी कला आणि वाणिज्य व श्री.बी बी कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय,धडगांव ता.अक्रानी, जि. नंदुरबार.**

**सौ. स्नेहल सचिन कुलकर्णी**

**ग्रंथपाल, सर डॉ. एम. एस.गोसावी कॉलेज ऑफ फिजिओथेरपी अँड एचसीएम, नाशिक**

divyajyot02@gmail.com and snehalkulkarni1981@gmail.com

सारांश : **कोणत्याही देशाचा कणा हा तेथील अर्थव्यवस्थेवर अवलंबून असतो. परंतु सध्या कोविड सारख्या महामारीमुळे सगळ्यांना माहिती झाले आहेत कि खरा कणा हा देशाच्या आरोग्य व्यवस्थेवर टिकून आहे. गंभीर स्वरूपातील आरोग्य सेवांच्या आव्हानांचा सामना करण्याकरीता संशोधन आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांचा पाठपुरावा करण्यासाठी आरोग्य विज्ञान ग्रंथालयाची भूमिका फार् मोलाची आहे. वैद्यकीय विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये सातत्याने होत असलेल्या प्रगतीमुळे वैद्यकीय क्षेत्रातील अभ्यासक्रम सतत अद्ययावत आणि आधुनिक करणे महत्त्वाचे आहे. या आधुनिक व अद्ययावत अभ्यासक्रमाच्या धर्तीवर आरोग्य विज्ञान ग्रंथालये हे वैद्यकीय क्षेत्रातील हे नवीनतम ज्ञान व त्याच्या शी निगडीत असलेले विविध ग्रंथालयीन संसाधने , सेवा व सुविधा आणि कौशल्यांनी सुसज्ज असतील.**

**प्रस्तावना :**

शिक्षणाचा प्रसार स्वांतत्र्योत्तर काळात शहरात तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर झाला आहे. वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि भारतीय पध्दतीने वैद्यकीय शिक्षण यांच्या समतोल विकासासाठी तसेच आरोग्य विज्ञान शिक्षणाची गुणवत्ता नियोजनबध्द वाढविण्याच्या दृष्टीने या ग्रंथालयांची भूमिका,सेवा व सुविधा हे माहित करून घेणे गरजेचे आहेत. या अभ्यासाचा उद्देश आरोग्य विषयक वाचनसाहित्याशी निगडीत स्त्रोत उपलब्ध होवून, तसेच सेवा व सुविधांबरोबरच आरोग्य शिक्षणाच्या दर्जात अमूल्य चांगल्या सुधारणा होवून आरोग्य ग्रंथालयाचा विकास व वाढ होणे गरजेचे आहे.

**आरोग्य विज्ञान शिक्षण :**

आरोग्य विज्ञान शिक्षण म्हणजे वैद्यकीय ज्ञान व कौशलये ज्यांना शिकविले जातात.मानवी प्रतिबंध व उपचारासाठी विविध महाविद्यालयाद्वारे मानवी रोग व त्यावरील उपचार याबाबत शिकविले जाते. आरोग्य विज्ञान शिक्षणाचा मुख्य हेतू डॉक्टरांना प्रशिक्षित करणे,व त्यातील नवनवित**म** ज्ञान आणि मूलभूत **कौशल्य** विकसित करणे हा होय .

**आरोग्य विज्ञान ग्रंथालये ( केन २००४):-**

"The Health Science Library is one which is concerned predominatly with collection of documents & information in the field of health science which provides its services exclusively or largerly to the members of Health Science profession or health science Colleges"

**आरोग्य विज्ञाशी संबंधित ग्रंथालयाचा विकास :-**

भारतात आरोग्य विज्ञाशी संबंधित असलेल्या ग्रंथालयांचा विकास १९६६ मध्ये झाला. जेव्हा केंद्रीय वैद्यकीय ग्रंथालय आरोग्य सेवा महासंचालक दिल्ली यांना राष्ट्रीय वैद्यकीय ग्रंथालय म्हणून नियुक्त करण्यात आले होते. यामध्ये देशातील वैद्यकीय समुदायाला संबंधित साहित्य व माहिती प्रसारीत करता येते. १९७८-७९ दरम्यान १०६ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वार्षिक एकूण प्रवेश क्षमता सुमार १३००० होती व वार्षिक उत्पादन १०००० इतके होते परंतु एवढ्या मोठ्या संख्येने वाचकांच्या माहितीच्या गरजा पुर्ण करण्यासाठी ग्रंथालयांमध्ये सुधारणा करण्यात आलेली नाही. १९८२ च्या तुलनेत १९८५ मध्ये महाविद्यालयांची संख्या वाढली परंतु १९७० च्या तुलनेप्रमाणे ग्रंथालयांच्या स्थितीत कोणतीही सुधारणा झाली नाही १९८० च्या उत्तरार्धात MEDLARS (मेडलर्स) ऑपरेशन हे भारतातील महत्त्वाचे पाऊल ठरले. नोव्हेंबर १९८७ मध्ये NLM (National Library of Medicine) USA व NIC (National Informatics Center) यांच्यात MEDICINE व POPLINE डेटाबेसमध्ये Online प्रवेशासाठी करार करण्यात आला आणि हा प्रकल्प १९८८ पासून कार्यरत आहे. **आरोग्य विज्ञान ग्रंथालयामध्ये विविध ग्रंथालयाचा समावेश होतो.** ती पुढीलप्रमाणे - १) वैद्यकीय महाविद्यालये २) दंत महाविद्यालये ३) नर्सिंग महाविद्यालये ४) आयुर्वेदिक महाविद्यालये ५) फिजिओथेरपि महाविद्यालय.

**आरोग्य विज्ञान ग्रंथालयाचे स्वरूप :-**

आरोग्य विज्ञान ग्रंथालये हि आरोग्य विज्ञान क्षेत्राशी निगडित असणाऱ्या विद्यापीठे ,संस्था ,डॉक्टर, विद्यार्थी,याच्यासाठी माहितीचा मुख्य स्रोत आहेत इतर ग्रंथालयाप्रमाणेच आरोग्य विज्ञान ग्रंथालयाचे घटक पुढीलप्रमाणे -

**आरोग्य विज्ञान विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयीन ग्रंथालयाचे मुख्य घटक:-**

आरोग्य विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयाचे घटक हे प्रामुख्याने असतात ते पुढीलप्रमाणे:-

१) माहितीचे वापरकर्ते, २) माहितीचा स्त्रोत, ३) माहितीसेवा

**१) माहितीचे वापरकर्ते :-**

आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संबंधित असलेल्या ग्रंथालयाचे वापरकर्ते हे पुढील प्रमाणे असतात.

**अ) विद्यार्थी :-**

विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, ई-बुक, इ-जर्नल्स, संशोधनपर लेख, प्रबंध, डेटाबेस इ.साधने त्यांच्या अभ्यासक्रमाशी निगडीत आवश्यक असतात.

**ब) शिक्षणतज्ञ व अभ्यासक :-**

यांना विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी व व्यावहारीक कामांसाठी नवनवीन विषयांवर वर्तमानपत्रातील लेख, संशोधनपर लेख, विविध नियतकालिकांतील माहितीपर लेख हे नवीन संकल्पना व कौशल्ये आत्मसात करण्यासाठी माहितीची गरज असते तसेच चर्चासत्र ऑनलाईन माहिती, परिसंवाद परिषदा यांविषयीही माहितीची गरज असते.

**२) महिती स्त्रोत :-**

आरोग्य विज्ञान ग्रंथालयात प्रामुख्याने माहिती स्त्रोताचे विभाजन पुढील वर्गात केले जाते.

अ. मुलभूत वैद्यकीय विज्ञान, शरीरशास्त्र, पॅथोलॉजी, फार्माकोलॉजी, फॉरेन्सिक मेडीसीन

ब.क्लिनिकल मेडिसीन मध्ये- बालरोगशास्त्र, कार्यचिकित्सक, शल्य शस्त्रक्रिया, नेत्ररोग, प्रसुती व स्त्रीरोग.

**ई-स्त्रोत-**

**१) मेडलाइन** (मेडिकल लिटरेचर एनालिसिस एंड रिट्रीवल सिस्टम ऑनलाइन) या मेडलर्स ऑनलाइन) जीवन विज्ञान **आणि** बायोमेडिकल **संदर्भात हा** एक **ग्रंथसूची डेटाबेस आहे.** यामध्ये चिकित्सा , नर्सिंग , फार्मेसी , दंत चिकित्सा , पशु चिकित्सा आणि

**2) अँकसेस मेडीसीन ACCESS MEDICINE:**

**McGraw Hill Medical** कडून **AccessMedicine** हे एक सर्वसमावेशक ऑनलाइन वैद्यकीय संसाधन आहे. वैद्यकीय विद्यार्थ्यांना मूलभूत विज्ञान अभ्यास आणि उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक असलेली विविध संसाधने प्रदान करते;

**3) मेडलर्स (MEDLARS) : (Medical Literature Analysis and Retrieval System)**

ही एक संगणकीकृत बायोमेडिकल ग्रंथसूची पुनर्प्राप्ती प्रणाली आहे. हे **1964** मध्ये नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनने सुरू केले होते आणि ही पहिली मोठ्या प्रमाणावर, संगणक आधारित, पूर्वलक्षी शोध सेवा हि सामान्य लोकांसाठी उपलब्ध **होती.1879** पासून, नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनने इंडेक्स मेडिकस प्रकाशित केले आहे, जे हजारो जर्नल्समध्ये वैद्यकीय लेखांसाठी मासिक मार्गदर्शक आहे. मोठ्या प्रमाणात संदर्भग्रंथांचे संदर्भ यात संकलित केले गेले. **1971** च्या उत्तरार्धात, **MEDLINE ("MEDLARS Online")** नावाची ऑनलाइन आवृत्ती निर्माण झाली.

**4) हिनारी HINARI ((Health Inter Network Access to Research Initiative) Online) :**

विकसनशील देशांना बायोमेडिकल आणि आरोग्य साहित्याच्या संग्रहात प्रवेश करण्यास सक्षम करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना आणि प्रमुख प्रकाशकांनी हिनारी ऍक्सेस टू रिसर्च फॉर हेल्थ प्रोग्रामची स्थापना केली होती. **10** पेक्षा जास्त देशांमधील आरोग्य संस्थांना **15,000** पर्यंत ई-जर्नल्स आणि **60,000** ऑनलाइन पुस्तके उपलब्ध आहेत. **100** पेक्षा जास्त देश, प्रदेश आणि प्रदेशांमधील आरोग्य संस्थांना **8500** हून अधिक लेख आणि **7000** ई-पुस्तके **(30** वेगवेगळ्या भाषांमध्ये) उपलब्ध आहेत, जी हजारो वैद्यकीय व्यावसायिक आणि संशोधकांसाठी फायदेशीर आहेत.

**4) एमडी कॅन्सलट MD CONSULT:**

हे डॉक्टर आणि इतर आरोग्य सेवा व्यावसायिकांसाठी तयार केलेले ऑनलाइन संसाधन आहे. हे चिकित्सकांना "ऑनलाइन वैद्यकीय सामग्रीचा सर्वात प्रसिद्ध संग्रह" एकत्रित करून वैद्यकीय प्रश्नांची त्वरीत उत्तरे देण्यासाठी **तयार केलेले आहे.यात ८० हून अधिक जर्नल्स आहेत. वैद्यकीयदृष्ट्या संबधित औषधांची माहिती दिली आहे.**

**ELIN-Electronic Library Information Navigator.**

**5) पॉपलाइन POPLINE:**

जॉन्स हॉपकिन्स ब्लूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ/सेंटर फॉर कम्युनिकेशन प्रोग्राम्स येथे नॉलेज फॉर हेल्थ प्रकल्पाद्वारे देखरेख केलेले हे एक विनामूल्य संसाधन आहे आणि युनायटेड स्टेट्स एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट (USAID) द्वारे निधी दिला जातो. यात जर्नल लेख, वैज्ञानिक, तांत्रिक आणि प्रोग्रामेटिक प्रकाशने तसेच अप्रकाशित दस्तऐवज आणि प्रकल्प अहवाल (ग्रे साहित्य) यासह विविध सामग्रीचे संदर्भ ग्रंथीय उद्धरण आणि गोषवारा यांचा समावेश आहे.

**6) पबमेड PUBMED:**

**PubMed** एक ऑनलाइन संसाधन आहे जे विनामूल्य आहे.**1996** मध्ये त्याची निर्मिती **झाली.** यू.एस. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन (NLM) मधील नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजी इन्फॉर्मेशन (NCBI), जे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थचा भाग आहे,या डेटाबेसमध्ये बायोमेडिकल प्रकाशनांमधील 34 दशलक्षाहून अधिक उद्धरणे आणि गोषवारा उपलब्ध आहेत. पूर्ण-मजकूर जर्नल लेख समाविष्ट केलेले नसले तरी, त्यांच्या लिंक्स वारंवार असतात.

**7) वेब ऑफ सायन्स WEB OF SCIENCE:**

**वेब ऑफ** सायन्स **हा पूर्वी वेब ऑफ नॉलेज म्हणून ओळखले जात होते.१९९७ पर्यंत हे Institute for Scientific Information या माहिती संस्थेने तयार केले होते.२०१६पासून त्याची मालकी क्लॅरिव्हेट या संस्थेकडे आहे.** वेब ऑफ सायन्स हा वैज्ञानिक संशोधनाचे मोजमाप, मूल्यमापन आणि मागोवा घेण्यासाठी वापरला जाणारा द्विमितीय डेटाबेस आहे. डेटाबेसमध्ये अग्रगण्य वैज्ञानिक जर्नल्समध्ये प्रकाशित वैज्ञानिक लेख आणि इतर साहित्य समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त, वेब ऑफ सायन्समध्ये विविध क्षेत्रातील संशोधन पद्धती आणि विषय समाविष्ट आहेत.वेब ऑफ सायन्सचा वापर वैज्ञानिक संशोधनाचा मागोवा घेण्यासाठी, मूल्यमापन करण्यासाठी आणि तुलना करण्यासाठी केला जातो. शास्त्रज्ञांना लेख आणि नियतकालिकांच्या मूल्यांकनांमध्ये उद्धरणांची संख्या, प्रभाव घटक आणि इतर मेट्रिक्स. हे मूल्यांकन संशोधकांचे कार्यप्रदर्शन आणि जर्नल्सची गुणवत्ता निश्चित करण्यात मदत करतात. **पण हे** सेवा सशुल्क आहे.

**8) सीनहेल CINHAL (Cumulative Index to Nursing & Allied Health):**

हा एक ग्रंथसूची डेटाबेस आहे ज्यामध्ये नर्सिंग आणि संबंधित आरोग्य व्यवसायांच्या क्षेत्रांचा समावेश आहे,शारीरिक उपचार, आपत्कालीन सेवा, चिकित्सक सहाय्यक, आरोग्य शिक्षण, रेडिओलॉजिकल तंत्रज्ञान, वैद्यकीय/प्रयोगशाळा तंत्रज्ञान **इ.बद्दल माहिती आहे.**

**माहितीसेवा :**

ग्रंथ देवघेव सेवा,संदर्भसेवा, प्रचलित जागरुकता सेवा,निवडक माहितीचे प्रसारण सेवा भाषांतर सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा, वेबओपॅक, ई-मेल सुविधा, प्रतिलिपी सेवा,रेफरल सेवा, ई-देण्यात येतात. सूची तयार करणे,प्रलेखन सेवा प्रदान करणे,नियतकालिक लेखांचे निर्देश करणे,सारसेवा पुरविणे, संशोधनाबाबत अद्यावत माहिती पुरविणे, संगणकीय नेटवर्क मार्फत माहितीची प्राप्ती करून देणे.**यांचा समावेश होतो.**

**समारोप:**

आजच्या काळात आरोग्य विज्ञान ग्रंथालये ही तंत्रज्ञानाची कास धरत आहे.यावरून असे दिसून येते कि आज भारतातील बहुतांश आरोग्य विज्ञान ग्रंथालयांमध्ये माहिती तंत्रज्ञानासाठी चांगल्या पायाभूत सुविधा आहेत. वैद्यकीय शास्त्राच्या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांसाठी असंख्य डेटाबेस उपलब्ध आहेत.भारतातील आरोग्य शिक्षणावरील ऐतिहासिक दृष्टीकोनातून, आरोग्य विज्ञान शिक्षण किंवा आरोग्य विज्ञान संस्थांमधील प्रमुख घडामोडी तसेच ग्रंथालये किंवा माहिती केंद्रांच्या समांतर प्रगती निश्चित करण्याचा प्रयत्न करीत आहे .

**संदर्भ:- (References)**

**[1].** A/Ansari, H.A. & A/-Fnezi, S.(2001): Health Sciences Libraries in Kuwait : a study of their resources, Facilites, and Services. Bulltein of the medical Library Association, 89(3)287-293.

**[2].** Alian, R.M. (1998): Medical Libraries in the State of Bahrain, Info & Lib Rev bec; Vol 30(4): 289-301 (Google Scholar).

**[3].** Bairwa,Rekha. (2016): Health Science Libraries in Rajasthan: challenges and opportunities in 21st Century, pp10-11.

**[4].** Dixit, R.P. (1995): Health Science Libraries in India. Their Resoureces & Services, the International Information & Library Review Vol-27(2) PP-129-142, Avalibale athttps//www.sciencedirect.com/science/article/pii/s 51057231495800026.

**[5].** खोत,नमिता आणि बर्वे,राहुल: युजर स्टडी आणि युज स्टडी चे ग्रंथालयीन उपयोजन ,ज्ञानगंगोत्री: डिसेंबर -जानेवारी -फेब्रुवारी २०१०-२०११:११-१७ .

**[6].** जाधवण् संदीपबाळासाहेब(2017) : user study of Health Science Libraries in Kolhapur District Avaliable at http:/hdl.handble net/123456789/4174.

**[7].** Martin, N. (1988): The Medical library : hidden task and staff development, Saudi Bull opth vol 3(1)37-8 (Google Scholar)

**[8].** Sutherland, Brown (1986): The Kesh Medical Library resources, Saudi Bull opthvoll (4)26-7(Google Scholar).

**[9].** Umenwa, Ekene, et.at (2016). Assessment of Available Resources and Library Services Provided in two medical libraries in south East Ligeria, International Journal of Library Science, Vol-5(1)PP-1-6 Doi : 10.5923/j-library.20160501.

**[10].** https://www.mpsctoday.com / Maharashtra.university- healthscience.mu

**[11].** https:mr.vikaspedia.in/ education/ career-guidance

**[12].** https://en-m-wikipedia-Hinari

**[13].** https://blogs.upstate.edu/library